# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## ई-निविदा सुचना

जा.क्र.नांवाशमनपा/आव्यवि/3610 /2025 दिनांक 12 Jun 2025 /05/2025

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकरिता लागणारे जीवरक्षक व तराफे नोंदणीकृत संस्थेकडुन पुरवठा करुन घेणेसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सुचना केवळ शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी करता येतील व भरता येतील. याकरीता Digital Signature चे रजिस्ट्रेशन असणे अनिवार्य आहे. याबाबत इतर सविस्तर अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | 13/06 /2025 | 15:00 नंतर |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | 13/06 /2025 | 15:00 |
| 3 | ई-निविदा भरणे | 13/06 /2025 | 15:00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 27/06/2025 | 15:00 पर्यंत |
| 5 | ई-निविदा उघडणे | 30/06/2025 | 15:00 नंतर |

| अ. क्र. | कामाचे नाव | पदाचे नाव | जीवरक्षकांची संख्या | अनामत रक्कम | कोऱ्या दरपत्रकाची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागास साल सन 2025-26 ते 2026-27 करीता जीवरक्षक व तराफे पुरवठा करुन वेळोवेळी तैनात करणे बाबत. | जीवरक्षक व तराफे | 180 | 1,10,000 | 10,000 | 31.03.2027 पर्यंत |

स्वा/-
**अतिरीक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी:-

1. ई-टेंडर विभाग/संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
2. जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, मनपा नोटीस बोर्डवर दरपत्रक सुचना प्रसिध्द करणेस्तव.
3. मा. संपादक, --दै. गोदातीर------------(विभागीय/मराठवाडास्तर)/-दै. उद्याचा मराठवाडा----------(जिल्हास्तर) यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील ई-दरपत्रक सुचना आपल्या दिनांक /06/2025 रोजीच्या वृत्तपत्रात 10 X 12 से.मी. आकारामध्ये कमीत कमी जागेत प्रसिद्ध करुन बिलाच्या 2 प्रतिसह देयकासाठी सादर करावे.

**अतिरीक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

# जिवरक्षक ई-निविदा-2025

# निविदाधारकांनी ई-निविदा दाखल करतांना पालन करावयाच्या अटी व शर्ती.

1. जिवरक्षक पुरवठा करणारी संस्था हि विहीत प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.
2. शॉपअॅक्ट प्रमाणपत्राची प्रत सादर करणे अनिवार्य आहे.
3. कंपनी/एजन्सीकडे EPF व ESIC यांची नोंदणी असणे बंधनकारक आहे.
4. कंपनी/एजन्सीकडे GST REGISTRATION असणे आवश्यक आहे.
5. कोऱ्या निविदेची किंमत रु. 10,000/- हि ऑनलाईन गेटवेद्वारे भरणा करून त्याची लिफाफा क्र.01 मध्ये पावती जोडणे आवश्यक आहे.
6. INCOME TAX RETURN (2021-22, 2022-23, 2023-24) सादर करणे बंधनकारक राहील.
7. निविदेसोबत 1% EMD रु.1,10,000/- ऑनलाईन गेटवेद्वारे भरणा करुन त्याची लिफाफा क्र.01 मध्ये पावती जोडणे आवश्यक आहे.
8. आपल्या संस्थेविरुध्द कोणतेही कायदेशीर पेच प्रसंग, आपल्या संस्थेचे कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या काळ्यायादीत नाव नसल्याने व आपल्या संस्थेविरुद्ध कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत फौजदारी, दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे तसेच आपल्या संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे शपथपत्र रुपये 100/- च्या बॉडपेपरवर नोटरी करुन सादर करणे बंधनकारक राहील.
9. कंपनी/एजन्सीच्या जिवरक्षकांना कोणत्याही प्रकारचे व्यसन (दारु, सिगारेट, गुटखा, तंबाखु, बिडी इत्यादी) असू नये,याचे हमीपत्र रुपये 100/- च्या बॉडवर नोटरी करुन सादर करणे बंधनकारक राहील.
10. निविदाधारकांनी लिफाफा क्र.02 मध्ये दर सादर करतांना किमान वेतन अधिनियमानुसार देय ठरणाऱ्या एकुण प्रती जिवरक्षक प्रति दिवस मानधन दरावर आपल्या संस्थेस द्यावयाचे सर्वीस चार्जेस टक्केवारीसह रुपयामध्ये रक्कम निविदेतील अनु.क्र.6 मध्ये नमुद करावी तथापी अ.क्र.7 मध्ये GST नमुद करुन शेवटी एकुण रक्कम टाकावी.
11. निविदाधारकांनी लिफाफा क्र.02 मधील सुचनेनूसार आपल्या संस्थेस द्यावयाचे सर्वीस चार्जेस दर हे अनु.क्र.6 मध्ये नमुद करतांना वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली ने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्र.29(1)/2014-PPD दि.28.01.2014 व No.31/14/1000/2014-GA दि.17.09.2014 मधील सूचना व अटीचे काटेकोरपणे पालन करावे. सदर अटीनुसार सर्वीस चार्जेस दर भरणा केले नसल्यास दरपत्रक ग्राहय धरल्या जाणार नाही.
12. तैनात करण्यात येणाऱ्या जिवरक्षकांचे वय हे 18 वर्षापेक्षा कमी व 50 वर्षापेक्षा जास्त नसावे.
13. विषयांकीत कामासाठी अंतीमरीत्या पात्र निविदाधारकाने करारनामा करण्यापुर्वी 180 जिवरक्षकांची (पट्टीचे पोहणारे इसम) यादी अथवा अनुभवी जिवरक्षक संस्थेसोबत टाय-अप करारनामा या कार्यालयात सादर करावा. त्यानंतरच सदर कामाचा करारनामा करुन कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येतील.
14. निविदा मंजुर झाल्यानंतर संबंधित एजन्सीला मंजुर रक्कमेच्या 4% सुरक्षा अनामत रक्कम मनपास भरावी लागेल त्यापैकी 2% FSD खात्यामध्ये ऑनलाईन RTGS प्रणालीद्वारे भरणा करावी व 2% देयकातुन कपात करण्यात येईल.
15. कंपनी/एजन्सीने निविदा ऑनलाईन दाखल करतांना आवश्यक सर्व कागदपत्रे स्कॅन करुन सादर करावे.
16. जिवरक्षकांचे मानधन दर निश्चितीसाठी किमान वेतन कायद्यानुसार अदा करणे बंधनकारक राहील. त्यानुसार BASIC, DA, EPF, ESIC, SERVICE TAX या सर्वबाबींचा उल्लेख करुन निविदा सादर करावी. तसेच सादर केलेली सर्व कागदपत्रे खोटी वा बनावट नसुन खरी व सत्य असल्याबाबत रु.100/- च्या बॉडपेपरवर कामाच्या नावासह बॉड नोटरी करुन सादर करावा.
17. नेमण्यात आलेल्या जिवरक्षकांचे EPF, ESIC भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदार, कंपनी/एजनसीची राहील.
18. एखादया जिवरक्षकास दुर्घटना अथवा कुठलीही इजा झाल्यास त्याचे प्रतिपुर्ती, औषधोपचार इत्यादी संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/एजन्सीवर राहील. त्यासाठी महानगरपालिका कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही.

19. कंपनी/एजन्सीला किमान वेतन कायद्याचे बंधन राहील तसेच इतर सर्व आवश्यक परवाने स्वत:कडे असणे आवश्यक व बंधनकारक राहील.
20. मनपाच्या आर्थिक परिस्थितीमुळे 3 ते 4 महिण्यापर्यंत बिल न मिळाल्यास स्वत: कंपनीस जिवरक्षकांचे वेतन मानधन द्यावे लागेल. जिवरक्षकांना वेतन न मिळाल्यास निदर्शने, उपोषण अथवा आंदोलन करण्याचा अधिकार राहणार नाही, त्यांनी त्यांच्या मागण्या नियुक्त कंपनी/एजन्सीकडे करावे त्यासाठी कंपनी/एजन्सी सर्वस्वी जबाबदार राहील.
21. कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देणेपुर्वी सर्व जिवरक्षकांच्या नावांची यादी (मोबाईल नंबरसह) सादर करणे आवश्यक असुन त्यानंतर कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर शासकीय विमा कंपनी कडून सर्व जिवरक्षकांचे विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.
22. जिवरक्षकांचे प्रति जिवरक्षक प्रति दिवस याप्रमाणे देय असलेले मानधन हे त्या-त्यावेळी तैनात करण्यात आलेल्या दिवसांनुसार हजेरीसह देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. जिवरक्षकांचे EPF, ESIC व आवश्यक असल्यास GST ही संबंधित संस्थेने भरणा केल्याचे चालन देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे.
23. जिवरक्षकांचा सेवा कालावधी 31.03.2027 पर्यंत राहील. त्यासाठी रितसर नियम अटीनुसार करारनामा/बंधपत्र शासननिर्णयानुसार योग्य रक्कमेचा मुद्रांकन पेपरवर करुन द्यावे.
24. जिवरक्षकांना प्रति दिवस देण्यात येणाऱ्या मानधनाशिवाय कोणत्याही प्रकारचा अतिकालीक भत्ता (OVER TIME) ,बोनस, सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.
25. जिवरक्षक संस्थेची/कंपनीची निवड त्यांनी करीत असलेल्या व केलेल्या कामाबद्दल आणि कमी दराची या बाबतीत मुल्यमापन केल्यानंतरच जास्त उत्कृष्ट असलेल्या संस्थेला/कंपनीला प्रथम प्राधान्याने दरपत्रक अंतिम करण्यासाठी बोलावण्याचे अधिकार मनपा प्रशासनाकडे असतील.
26. ज्या ठिकाणी जिवरक्षक कार्यरत असतील, त्या ठिकाणी सुरक्षिततेसंबंधी काही बाबी उपस्थित झाल्यास उदा.चोरी, अपघात, घुसखोरी यांची विनाविलंब तक्रार संबंधित जिवरक्षकांमार्फत संबंधित विभागप्रमुखांना द्यावी. तसेच जर अशा घटना जिवरक्षक यांचे हलगर्जीपणामुळे झाल्या असतील, असा निष्कर्ष निघाला असेल तर सदर नुकसानाची भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित जिवरक्षक संस्थेची/कंपनीची राहील.
27. जिवरक्षक सेवा पुरवठा करणेकामी काही हलगर्जीपणा अथवा करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास संबंधित जिवरक्षक संस्थेला एकुण मानधनाच्या 5% रक्कम दंड म्हणून आकारण्यात येईल.
28. नियुक्त जिवरक्षकांना ओळखपत्र, गणवेश, लाईफ जॅकेट्स व ईतर आवश्यक साहित्य पुरवठा करण्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहील. याकरिता महानगरपालिकेतर्फे कोणतेही अतिरीक्त देयक देण्यात येणार नाही किंवा सदरची रक्कम देयकात समाविष्ट करता येणार नाही.
29. काम समाधानकारक नसल्यास किंवा मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्यास सात दिवसाची नोटिस देऊन दिलेल्या मुदतीच्या आत कंत्राट संपुष्टात किंवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील.
30. सदरची ई-निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.
31. वरील अटी व शर्तीमध्ये कराराच्यामुदतीत काही वाद निघाल्यास आयुक्त, नांवाशमनपा यांचा निर्णय अंतिम राहील.

**अतिरीक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नोंदणीकृत संस्थेकडुन जिवरक्षक व  तराफे पुरवठा करणे संदर्भात ई-निविदा

**लिफाफा क्र.01 मध्ये खालील आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.**

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रांचे विवरण |
|---|---|
| 1 | ऑनलाईन कोरी निविदा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत. |
| 2 | ऑनलाईन EMD रक्कम भरणा केलेल्या पावतीची प्रत. |
| 3 | विहित प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावी. |
| 4 | शॉपॲक्ट प्रमाणपत्राची प्रत सादर करणे अनिवार्य आहे. |
| 5 | वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| 6 | भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| 7 | राज्य कामगार विमा योजना (ESIC) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| 8 | संस्थेनी नेमण्यात येणारे जिवरक्षकांना कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याबाबतचे शपथपत्र रुपये 100/- च्या बाँडवर नोटरी करुन सादर करावे. |
| 9 | संस्था कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या काळया यादीत नसल्याचे तसेच त्यांच्या संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारची फौजदारी, दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे व कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे शपथपत्र रुपये 100/- च्या बाँडवर नोटरी करुन सादर करावे. |
| 10 | मागील 03 वर्षाचा (2021-22, 2022-23,2023-24)आयकर भरणा केल्याची प्रत सादर करावी. |

**अतिरीक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नोंदणीकृत संस्थेने जिवरक्षक व तराफे पुरवठा करणे संदर्भात दरपत्रक

**लिफाफा क्र.02 (निविदा विवरणपत्र)**

**Price BID- to be filled by Bidders:-**

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति जिवरक्षक प्रति दिवस (अ) | दर प्रति तराफा (साईज 12X12 फुट लाकडी तराफा थर्माकॉल शिटसह) प्रति दिवस (ब) |
|---|---|---|---|
| 1 | परिमंडळ-1 महानगरपालिकेकरिता अर्धकुशल कंत्राटी कर्मचारी किमान मुळ वेतन (13000 नुसार) दर प्रति जिवरक्षक (दिनांक 24 फेब्रुवारी 2015 नुसार) | 433/- | |
| 2 | विशेष भत्ता (DA) कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाच्या दि.20.02.2025 रोजी जाहिर केल्यानुसार (दिनांक 01.01.2025 ते दिनांक 30.06.2025 या कालावधीसाठी रु.9100/- नुसार) | 303/- | |
| | **एकुण किमान वेतन प्रति जिवरक्षक** | 736/- | ....................../- |
| 3 | भविष्य निर्वाह निधी (EPF) 12% | 52/- | |
| 4 | प्रशासकीय खर्च भनिनि करिता 1.15% | 5/- | |
| 5 | राज्य कामगार विमा योजना (ESIC) 3.25% | 14/- | |
| | **एकुण किमान वेतन व भत्ते प्रति जिवरक्षक** | 807/- | |
| 6 | संस्थेने सेवा आकार दर (% नुसार) नमुद करुन सादर करावा. | ................/- | |
| 7 | सेवाकर (GST) आवश्यक असल्यास (% नुसार) नमुद करुन सादर करावा. | ................/- | |
| | **एकुण रक्कम प्रति जिवरक्षक(अ) आणि प्रति तराफा(ब) प्रति दिवस** | ................/- | ......................../- |

उपरोक्त बाबींमध्ये **अर्धकुशल** किमान वेतनाबाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या सुचनेचे तात्काळ परिणामाने पालन करण्यात येईल.

**संस्थेसाठी सूचना:-**

1) निविदाधारकाने **रकाना क्र. (अ)** मध्ये अ.क्र.6 मध्ये सेवा आकार दर प्रति जिवरक्षक प्रति दिवस याप्रमाणे बेसरेट रु.807 या रक्कमेवर % मध्ये सादर करावा तसेच अ.क्र.7 मध्ये **बेसरेट वर** GST ॲड करुन शेवटी प्रति जिवरक्षक प्रती दिवसाची एकुण रक्कम नमुद करावी.

2) निविदाधारकाने प्रति तराफा (12X12फुट) प्रती दिवस याप्रमाणे **रकाना क्र.(ब) मध्ये** सर्व करासह दर सादर करावे.

3) पात्र निविदाधारकास किमान वेतन व भत्ते शासनाच्या वेळोवेळी निर्गमित आदेशानुसार अदा करण्यात येतील.

4) पात्र संस्थेनी जिवरक्षक पुरग्रस्त परिस्थितीत आवश्यकतेनुसार कोणत्याही वेळी केंव्हाही तैनात करावे लागतील.

5) संस्थेच्या जिवरक्षकांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड नावाचा गणवेश स्वखर्चाने घेऊन परिधान करणे आवश्यक आहे.

6) संस्थेनी सर्व जिवरक्षकांचा विमा काढणे बंधनकारक आहे, जर जिवरक्षकांच्या जिवीतास काही हानी झाल्यास त्यास केवळ ती संस्था जबाबदार असेल मनपा नाही.

मी/आम्ही वरील सर्व नियम व अटी तसेच ई-निविदेतील सर्व सूचना वाचल्या असुन वरील तक्त्यामध्ये **रकाना क्र.(अ)** व **रकाना क्र. (ब)** मध्ये अनुक्रमे जिवरक्षक व तराफयांसाठी सर्व करांसह प्रति दिवस याप्रमाणे कमीत कमी दर सादर केलेले आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

संस्थेचे नाव व पत्ता

(शिक्क्यासह)